बृहन्मुंबई महानगरपालिका

**<u>परिपत्रक</u>**

**2020-21**

क्र.प्रले (वित्त)/व्यय/ ५५ दिनांक ०२.03.2021

विषयः बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यांनी पाच्च लाख रुपयांहून अधिक व पंच्याहत्तर लाख रुपयांहून अधिक नसेल इतक्या खर्चाचा अंतर्भाव असेल असा आयुक्तांनी केलेल्या संविदाचे प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भः 1. क्र.प्रले/एफआरडी-एक/08 दिनांक 15.05.2012

2. क्र.प्रले/एफबीई/32 दिनांक 21.01.2016

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या इतर कलमासह कलम 69 व कलम 72 या आर्थिक बाबींशी संबंधित कलमामध्ये केलेली सुधारणा दिनांक 18.08.2011 रोजी `महाराष्ट्र शासन राजपत्रात सन 2011 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.32' मध्ये प्रसिध्द केली आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 69 च्या सुधारित तरतुदीनुसार ``परंतु ज्यात पाच लाख रुपयांहून अधिक असेल आणि पंच्याहत्तर लाख रुपयांहून अधिक नसेल इतक्या खर्चाचा अंतर्भाव असेल अशी, आयुक्तांने केलेली प्रत्येक संविदा, ती करण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत त्यांच्याकडून स्थायी समितीला कळविण्यात येईल". या सुधारित तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-यांच्या मंजुरीने विभाग पातळीवर तसेच विविध खात्यांनी केलेल्या संविदाची माहिती संकलित करुन व त्यांची लेखा पडताळणी करुन प्रत्येक पंधरवडयाला एकत्रित प्रस्ताव स्थायी समितीला सादर करण्यात येत होता. तथापि, वेळोवेळी प्रसारीत केलेल्या परिपत्रकातील निदेशाचे काटेकोरपणे अनुपालन केले जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे परिपत्रक क्र.प्रले/एफबीई/32 दिनांक 21.01.2016 अन्वये प्रस्तावांची माहिती सादर करणेबाबत काल-मर्यादा निश्चित करुन फेर-निदेश देण्यात आले.

तथापि असे निदर्शनास आले आहे की, संदर्भित परिपत्रकातील निदेशाचे संबंधित खात्यांकडून काटेकोरपणे पालन केले जात नाही. त्यामुळे प्रमुख लेखापाल (वित्त), प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) व प्रमुख लेखापाल (म.ख.खा.) खात्यामार्फत स्थायी समितीच्या माहितीस्तव एकत्रित प्रस्ताव विलंबाने सादर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. असे एकत्रित माहिती प्रस्ताव फेरविचारार्थ/संपूर्ण तपशिलासह पुन्हा सादर करण्याकरिता परत करण्यात आलेले आहेत. विभाग पातळीवर तसेच विविध खात्यांनी केलेल्या संविदांची

प-16

माहिती ही संबंधित विभाग व खात्यास अवगत असल्यामुळे यापुढे खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्याचे निदेश देण्यात येत आहेतः-

1. विभाग कार्यालय व विविध खात्यातील संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावांची माहिती कंत्राटदाराला कार्यादेश दिल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या सात दिवसांच्या आत परिपत्रकासह जोडलेल्या विहित नमुन्यात तयार करुन त्याची संबंधित लेखा अधिकारी यांच्याकडून पडताळणी करुन घ्यावी.
2. संबंधित लेखा अधिकारी यांनी दोन दिवसांत पडताळणी करुन त्यांच्या अभिप्रायासह संबंधित कार्यकारी अभियंता यांना परत करावी.
3. विभाग कार्यालय व विविध खात्यातील संबंधित कार्यकारी अभियंता हे प्राप्त लेखा अभिप्राय व आवश्यकतेनुसार योग्य ते फेरबदल करुन, त्यास विभागीय सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख/अधिष्टाता यांची मान्यता प्राप्त करुन, विहित नमुन्यातील तपशिलवार माहिती (युनिकोड फॉन्टमध्ये सॉफ्टकॉपीसह) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या आठवडयात महापालिका चिटणीस कार्यालयास सादर करतील.

सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख/अधिष्ठाता तसेच सर्व संबंधित लेखा अधिकारी/उप प्रमुख लेखापाल यांनी उपरोक्त निदेशांची नोंद घ्यावी व स्थायी समितीस विहित वेळेत माहिती सादर होण्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**(नरेंद्र संखे)**
**प्रमुख लेखापाल(म.ख.खा.) प्र.**

**(रामदास क. आव्हाड)**
**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)/**
**प्रमुख लेखापाल (वित्त)**

**(पी. वेलरासू)**
**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)**

# विहीत नमूना

## १) रू. ५ लाख ते रू.५० लाख इतक्या खर्चाचा अंतर्भाव असलेल्या संविदांची तपशीलवार माहिती.

| अनु. क्र. | खात्याचे नाव | विषय | निविदा क्रमांक<br>नियत दिनांक<br>एकूण प्राप्त झालेल्या निविदा<br>(निविदा न मागविता कार्यादेश दिले असल्यास त्याची कारणे तळटिप स्थानी नमूद करावीत.) | मंजुरी प्राधिकारी<br>मंजुरी क्र. व दिनांक | कार्यादेश दिलेल्या कंत्राटदाराचे नाव<br>कार्यादेश क्र. व दिनांक | मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

## २) रू. ५० लाखांहून अधिक परंतु रू. ७५ लाख इतक्या खर्चाचा अंतर्भाव असलेली संविदांची तपशीलवार माहिती.

| अनु. क्र. | खात्याचे नाव | विषय | निविदा क्रमांक<br>नियत दिनांक<br>एकूण प्राप्त झालेल्या निविदा<br>(निविदा न मागविता कार्यादेश दिले असल्यास त्याची कारणे तळटिप स्थानी नमूद करावीत.) | मंजुरी प्राधिकारी<br>मंजुरी क्र. व दिनांक | कार्यादेश दिलेल्या कंत्राटदाराचे नाव<br>कार्यादेश क्र. व दिनांक | मंजुर रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

तळटिप :- उपरोक्त नमूद प्रस्तावांशी संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचा कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक (विस्तारीत क्रमांकासह)/भ्रमणदूरध्वनी संपर्क क्रमां कृपया नमूद करण्यात यावा जेणेकरून संबंधित अतिरिक्त आयुक्त यांना याबाबत अवगत करण्याची वेळ तसेच स्थायी समितीच्या बैठकीची वे कळविणे शक्य होईल. त्यावेळी संबंधित अधिकारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व पदनाम
खात्याचे नाव

पडताळले

लेखा अधिकारी (            )